


सआदत हसन मंटो हे उर्दूतील प्रसिद्ध साहित्यिक. त्यांच्या अनेक कथांवर खटले झाले त्यामुळे ते आपल्याला माहिती असतात. पण त्यांनी अनेक 'व्यक्तिचित्र' ही लिहिली. त्यात त्यांनी चित्रपटसृष्टीतील काही व्यक्तींचं पारदर्शी चित्रण केलेलं आहे. त्यांनी नर्गिस, नसीम, अशोककुमार, कुलदीप कौर, श्याम सितारा, बी.ए. देसाई आणि इस्मत चुगताई यांची 'व्यक्तिचित्र' आपल्या लेखणीने रेखाटली आहेत. ते या व्यक्तीकडे एक मित्र म्हणून आणि एक कलाकार म्हणूनही पाहतात. आम्ही 'चंदेरी'च्या वाचकांसाठी मंटो यांनी लिहिलेलं 'अशोककुमार' यांचं व्यक्तिचित्र देत आहोत.

अशोककुमार!

लेखक –सआदत हसन मंटो
अनुवाद – चंद्रकांत भोंजाळ



नजमुल हसन देविकाराणीला घेऊन पळाला तेव्हा बॉम्बे टॉकीजमध्ये गोंधळ माजला. चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात झालेली होती. काही दृश्यंही चित्रित झाली होती. तेवढ्यात नजमुल हसन आपल्या हिरॉईनला चित्रपटाच्या खोट्या दुनियेतून वास्तवात घेऊन गेला. देविकाराणीचा नवरा हिमांशु राय हा सगळ्यात जास्त काळजीत पडला. कारण बॉम्बे टॉकीजचा सगळा भार त्याच्यावरच होता. तो त्या संस्थेचा 'ब्रेन' समजला जाई.


त्या काळी एस. मुखर्जी (अशोककुमारचा मेहुणा) बॉम्बे टॉकीजमध्ये साऊंड इंजिनीयर सावक वाचा यांचा असिस्टंट म्हणून काम करत होता. पुढे तो रौप्यमहोत्सवी चित्रपटांचा निर्माता म्हणून ओळखला जाऊ लागला. केवळ बंगाली असल्याने त्याला हिमांशु राय यांच्याबाबत सहानुभूती वाटत होती. देविकाराणीला कसंही करून परत आणायला हवं असं त्यांचं मत होतं. म्हणून त्यांनी आपले बॉस हिमांशु राय यांच्याशी चर्चा न करता आपल्या पद्धतीने प्रयत्न केले आणि देविकाराणीला नजमुल हसनच्या बाहुपाशातून सोडवून त्यांनी तिला बॉम्बे टॉकीजमध्ये परत आणलं. इथेच तुझ्या कलागुणांना वाव मिळेल आणि तुला प्रसिद्धी, पैसा मिळू शकेल ही गोष्ट त्यांनी देविकाराणीला पटवून दिली.

देविकाराणी परत आली. एस. मुखर्जी यांनी हिमांशु राय यांचीही समजूत काढली आणि नजमुल हसन मात्र असफल प्रेमिकांच्या रांगेत जाऊन उभा राहिला.

चित्रपट अर्धवट चित्रित झालेला होता. त्यातील दृष्यांना कात्री लावून नजमुल हसन असलेला फिल्मचा भाग कापून कचऱ्याच्या पेटीत टाकला गेला. पण मग देविकाराणीचा पडद्यावरचा हिरो कोण, असा प्रश्न उभा राहिला.



तो जिकडे जाईल त्या भागातला ट्रॅफिक जाम होत असे: शर्मिला टागोरबरोबर



हिमांशु राय हे अत्यंत कष्टाळू, रात्रंदिवस आपल्याच कामात मग्न राहणारे आणि लोकांपासून दूर राहणारे फिल्म निर्माता होते. त्यांच्यामुळेच एक चित्रपट निर्माण करणारी आदर्श संस्था म्हणून बॉम्बे टॉकीजचा नावलौकिक होता. त्यांनी कंपनीसाठी मुंबईपासून दूर 'मालाड' या उपनगरात जागा घेतलेली होती. ते बाहेरच्या कुणालाही कंपनीत येऊ देत नसत. कारण बाहेरच्या माणसांबद्दल त्यांचं फारसं चांगलं मत नव्हतं. नजमुल हसन हा बाहेरचाच माणूस होता.

इथे पुन्हा एस. मुखर्जी आपल्या भावुक स्वभावाच्या मालकाच्या मदतीला धावून आला. त्यांचा मेव्हणा अशोककुमार बी.एस्सी. झाल्यावर एक वर्ष वकिलीचं शिक्षण घेऊन बॉम्बे टॉकीजच्या लॅबमध्ये विनावेतन काम शिकण्यासाठी आलेला होता. तो दिसायला चांगला होता. त्याला थोडंफार गाणं-बजावणंही येत असे. एस मुखर्जी यांनी गप्पा मारताना सहज अशोककुमारचं नाव हिरो म्हणून सुचवलं. हिमांशु राय अनुभवी गृहस्थ होते. 'बघून घेऊयात' असं म्हणून त्यांनी जर्मन कॅमेरामन वारशिंग यांना अशोककुमारची टेस्ट घ्यायला सांगितली. मग हिमांशु राय यांनी ती पाहून अशोककुमारला पास केलं. जर्मन फिल्म डायरेक्टर फ्रांज ऑस्टिन यांचं मत वेगळं होतं. पण बॉम्बे टॉकीजमध्ये हिमांशु राय यांच्याविरुद्ध मतप्रदर्शन करण्याची कुणाचीच हिंमत नव्हती. त्यावेळी अशोककुमार २२ वर्षांचा होता. त्याची देविकाराणीचा हिरो म्हणून निवड करण्यात आली.

त्या दोघांना घेऊन एकामागोमाग एक असे बरेच चित्रपट निर्माण करण्यात आले. देविकाराणी आणि अशोककुमार यांची जोडी 'हिट' झाली हेती. या चित्रपटांपैकी अनेक चित्रपट यशस्वीदेखील झाले. देविकाराणी एखाद्या बाहुलीसारखी दिसायची आणि अशोककुमार निष्पाप दिसायचा. दोघांची जोडी पडद्यावर शोभून दिसे. त्याचं नाजूक प्रेम पाहून लोकांचं देहभान हरपून जाई. त्यामुळे पडद्यावरच्या या जोडीने लोकांच्या मनात घर केलं. शाळा-कॉलेजच्या मुलांना अशोककुमार त्यांचा आदर्श वाटे. ती मुलंही अशोककुमारसारखे लांब बाह्यांचे बंगाली कुडते घालून आणि तोंडाने - तु बनकी चिडीयां, मैं बन का पंछी, बन बन बोलू रे...' असं म्हणत रस्त्यांनी फिरत असत.




अशोक हा काही सराईत प्रेमी नव्हता

मी अशोककुमारचे खूप चित्रपट पाहिले. कलाकार म्हणून देविकाराणी अशोककुमारच्या कितीतरी कोस पुढे होती. पण अशोककुमार चॉकलेट हिरो म्हणून प्रेक्षकांना पसंत होता. नंतर त्यानेही हळूहळू आपले पंख बाहेर काढले.

अशोककुमार लॅबमधून चित्रपटाच्या पडद्यावर आला. तेव्हा त्याचा पगार ७५ रुपये महिना ठरविण्यात आला होता. त्यामुळे तो खूप आनंदात होता. त्या काळी एकट्या माणसाला शहरापासून दूर मालाडसारख्या गावात इतके रुपये खूप होत असत. नंतर त्याचा पगार एकदम दुप्पट १५० रुपये महिना झाला, तेव्हा तर तो फारच खूश झाला. पण १५० रुपयांवरून त्याचा पगार २५० रुपये केला गेला तेव्हा तो घाबरला. त्या वेळच्या मन:स्थितीचं वर्णन त्याने मला एकदा सांगितलं होतं. तो म्हणाला होता - 'बाय गॉड, मी खूप घाबरलो होतो. २५० रुपये महिना पगार! मी अकाऊंटंटकडून २५० रुपये घेतले तेव्हा माझे हात कापत होते. इतके रुपये कुठे ठेवायचे तेच मला समजत नव्हतं. माझं क्वार्टर खूप छोटं होतं. एक पलंग आणि तीन-चार खुर्च्या इतकंच सामान माझ्याकडे होतं. चारही बाजूला जंगल. रात्री कुणी चोर आला तर? ..त्याला जर माझ्याकडे २५० रुपये आहेत असं समजलं तर? मी घरी येऊन खूप विचार केला. शेवटी नोटा कॉटच्या गादीखाली पसरवून ठेवल्या. पण रात्रभर खूप भयानक स्वप्नं पडत होती. सकाळी उठल्यावर मी पहिल्यांदा पोस्टात गेलो आणि ते पैसे खात्यामध्ये भरून टाकले.'

अशोक ही गोष्ट मला सांगत असतानाच कलकत्त्यावरून एक निर्माता त्याला भेटायला आला. त्याने करारपत्र तयार करून आणलं होते. पण अशोककुमारने त्यावर सही करायचं नाकारलं. तो निर्माता ८० हजार रुपये द्यायला तयार होता आणि अशोककुमार १ लाख रुपये मागत होता.



कुठे अडीचशे रुपये आणि कुठे एक लाख रुपये!

अशोककुमारची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच गेली. तो कामाव्यतिरिक्त बाहेर पडत नसे. पण तो जेव्हा बाहेर दिसे तेव्हा लोकांमध्ये खळबळ माजत असे. तो जिकडे जाईल त्या भागातला ट्रॅफिक जाम होत असे. त्याच्या चाहत्यांचा त्याला गराडा पडे आणि शेवटी पोलिसांच्या लाठीचा प्रसाद देऊनच त्याची त्या गराड्यातून सुटका करून घ्यावी लागे.

अशोक आपल्यावर श्रद्धा असलेल्या लोकांचं प्रेम सहन करू शकत नसे. तो लगेचच चिडत असे.

'दादामुनी हे तुझं वागणं बरोबर नाही. तुला आनंद व्हायला हवा तर तू नाराज होतोयस. लोक तुझ्यावर मनापासून प्रेम करतात इतकंही तुला समजत नाही का?' असं मी त्याला कितीतरी वेळा म्हणालो असेन.

पण ही गोष्ट समजण्यासाठी त्याच्या डोक्यामध्ये तसा एखादा खणच उपलब्ध नाहीये.

प्रेमाच्या बाबतीत तो एकदम अनभिज्ञ आहे. (ही फाळणीपूर्वीची गोष्ट आहे. या वेळेपर्यंत त्याच्यामध्ये काही बदल झाला असल्यास तो मला माहिती नाही.) शेकडो तरुण आणि सुंदर मुली त्याच्या जीवनात आल्या. पण तो अतिशय कोरडेपणाने त्यांना सामोरा गेला. तब्येतीने तो एकदम जाड होता. त्याच्या खाण्यापिण्यात, वागण्याबोलण्यात आणि पेहरावातही एक गावंढळपणा होता.

देविकाराणीनेही त्याच्यावर प्रेम केलं. पण त्याने असभ्यपणे वागून तिच्या आशेवर पाणी टाकलं. एका अन्य अभिनेत्रीने अशोकला धीर करून घरी बोलावलं आणि खूप नाजूकपणे आपलं प्रेम व्यक्त केलं. पण अशोकने वाईट पद्धतीने बोलून तिचं मन दुखावलं. त्यामुळे त्या बिचारीला आपला पवित्रा बदलून 'मी तुमची परीक्षा घेत होते. तुम्ही तर मला भावासारखे आहात,' असं म्हणून वेळ मारून न्यावी लागली.

अशोकला एक अभिनेत्री आवडत असे. ती नेहमी स्वच्छ आंघोळ केल्यासारखी दिसत असे. अशोकला त्यामुळेच ती आवडत असे. शेवटी तिने अशोकला राखी बांधून भाऊ केलं तेव्हा त्याला खूप मनस्ताप झाला.

अशोक हा काही सराईत प्रेमी नव्हता. पण सामान्य माणसाप्रमाणे त्याला स्त्रियांचं निरीक्षण करायला आवडत असे. स्त्रियांच्या आकर्षित करून घेणाऱ्या गोष्टींबद्दलही तो मित्रांशी गप्पा मारत असे. कधी कधी एखाद्या स्त्रीशी शरीरसंबंध प्रस्थापित करावेत असंही त्याला वाटत असे. पण 'मंटो, यार हिंमत होत नाही,' असं म्हणून तो माघार घेत असे.


त्याच्यामध्ये साहस नावाची गोष्टच नव्हती. पण त्याची ही साहसहीनता त्याच्या वैवाहिक जीवनासाठी लाभदायकच ठरली. त्याची पत्नी शोभा हिच्यासमोर कधी त्याच्या साहसहीनतेविषयी आपण बोललो तर ती नक्की म्हणेल की, 'देवदयेने गांगुलीमध्ये असं साहस नाही आणि देवाने तसं साहस त्याच्या मनामध्ये निर्माणही करू नये म्हणून त्याची प्रार्थना करीन.'

शेकडो मुलींनी नैतिकता गुंडाळून ठेवून, लोकलज्जेची फिकीर न करता, त्याला प्रेमाच्या आगीत उडी घेण्याचं निमंत्रण दिलेलं असतानाही त्याच्या मनात हे साहस का निर्माण झालं नाही ही एक आश्चर्याचीच गोष्ट आहे. त्याच्या खाजगी पत्रव्यवहारामध्येही हजारो मुलींची प्रेमपत्रं आलेली असतीलच. पण मला जितकं माहिती आहे त्यावरून मी सांगू शकतो की, त्यातील १०० पत्रंदेखील त्याने वाचली नसतील. त्याचा मरीयल सेक्रेटरी डिसूजा त्या पत्रांची मजा चाखत ती वाचत असे आणि दिवसेंदिवस स्वतःच खंगून जात असे.

फाळणीपूर्वी काही महिने अशोक 'चंद्रशेखर' या चित्रपटाच्या शूटिंगसाठी कलकत्त्यामध्ये होता. बंगाल प्रांताचे त्यावेळचे प्रधानमंत्री हसन शहीद सुहरावर्दी यांच्याकडे तो गेला होता. तिथून परतताना दोन अँग्लोइंडियन मुलींनी त्याची गाडी आडवली आणि लिफ्ट मागितली. अशोकने काही वेळासाठी रंगेलपणा केला, पण त्याला आपली नवी सिगरेट केस गमवावी लागली. त्यातील एका मुलीने सिगरेट पिता पिता त्याची सिगरेट केसच लांबवली. त्या घटनेनंतर त्या मुलींशी संपर्क वाढवावा असं अशोकला कितीतरी वेळा वाटलं. पण त्याची हिंमत झाली नाही.

कोल्हापूरमध्ये एक जंगली चित्रपट बनवला जात होता. त्यातलं अशोकचं काम थोडंसंच राहिलं होतं. कोल्हापूरवरून कितीतरी वेळा बोलावणं आलं, पण अशोक गेलाच नाही. त्याचं मन त्या भूमिकेवरून उडालं होतं. पण करार झालेला होता. त्यामुळे एके दिवशी त्याला जावंच लागलं. तो मला बरोबर घेऊन गेला. त्यावेळी मी फिल्मिस्तानसाठी 'आठ दिन' नावाचा चित्रपट लिहीत होतो. तो चित्रपट अशोकच दिग्दर्शित करणार होता. तो मला म्हणाला - 'चलो यार! तिथं आरामात काम करू.'

पण तिथे आराम काही मिळाला नाही. अशोककुमार कोल्हापूरात आलाय हे लोकांना कळलं. त्यामुळे आम्ही जिथे थांबलो होतो तिथे लोकांची गर्दी जमू लागली. हॉटेलचा मालक हुशार होता. तो काहीतरी सांगून लोकांना हटवत असे. पण तरीही काही लोक हॉटेलमध्ये येऊन आपल्या



लाडक्या अभिनेत्याचं दर्शन घेतच असत.

त्या फॅन्सशी अशोककुमार खूप वाईट तऱ्हेने वागत असे. त्याची त्यावेळची प्रतिक्रिया काय असे हे आता मला आठवत नाहीये. पण प्रेक्षक म्हणून मलाही त्याचा राग आलेला होता.

एके संध्याकाळी आम्ही फिरायला बाहेर पडलो. अशोकने डोळ्यावर मोठा चष्मा घातलेला होता. हातात एक छडी घेतलेली होती. दुसरा हात त्याने माझ्या खांद्यावर ठेवलेला होता. आम्ही एका स्टोअरमध्ये गेलो. कोल्हापूरमध्ये धूळ फार होती. त्या धुळीपासून वाचण्यासाठी अशोकला काहीतरी औषध घ्यायचं होतं. त्याने स्टोअरवाल्याकडे औषध मागितलं. त्याने निर्विकारपणे आपल्या ग्राहकाकडे बघितलं आणि औषध आणायला तो कपाटाकडे गेला. पण तिथे गेल्यावर अचानक त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. तो वळून अशोकला म्हणाला - 'तुम्ही कोण आहात?'

अशोकने उत्तर दिलं - 'मी कोण आहे?... मी जो आहे तो आहे.'

स्टोअरवाल्याने लक्षपूर्वक चष्मा घातलेल्या अशोकच्या चेहऱ्याकडे पाहिलं - 'तुम्ही अशोककुमार आहात?' अशोकने खूप नाराजीने म्हटलं - 'अशोककुमार कुणी दुसरा असेल... चल मंटो!'

असं म्हणून त्याने माझ्या खांद्यावर हात ठेवला आणि आम्ही औषध न घेताच बाहेर पडलो. हॉटेलच्या जवळच्या वळणावर वळत होतो तेवढ्यात समोरून तीन मराठी मुली आल्या. त्या रंगाने गोऱ्यापान होत्या. कपाळावर कुंकू लावलेलं. केसात गजरे माळलेले. पायात चपला होत्या. त्यातील एका मुलीच्या हातात मोसंबी होत्या. अशोकला बघून ती एकदम 'अशोक!' म्हणून किंचाळली. आणि तिच्या हातातील मोसंब्या रस्त्यावर पसरल्या. अशोकने माझा खांदा सोडला आणि तो पळून गेला.

अशोकला उर्दू भाषा आवडते. सुरुवातीला त्याने उर्दूमध्ये लिहिण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्याची फारशी प्रगती झाली नाही. पण त्याला उर्दू भाषेची आवड आहे. एक-दोन ओळी तो उर्दूमध्ये लिहू शकतो. फाळणीनंतर मी त्याला सोडून पुन्हा बॉम्बे टॉकीजमध्ये आलो तेव्हा त्याने 'मी परत यावं' अशा अर्थाचं एक पत्र मला उर्दूमधून लिहिलं होतं. पण काही कारणांमुळे मी त्या पत्राचं उत्तर देऊ शकलो नाही याचं मला दुःख वाटतंय.

एस. मुखर्जी यांनी बॉम्बे टॉकीज सोडून नवीन फिल्मिस्तान नावाची चित्रपट संस्था काढली होती. तिथे माझी आणि अशोकची एकदा भेट झालेली मला आठवतेय. त्यापूर्वी मी त्याला अनेकदा ओझरतं भेटलेलो होतो. पण मी फिल्मिस्तानमध्ये नोकरीला लागलो तेव्हा त्याची आणि माझी व्यवस्थित भेट झाली होती.

चित्रपटसृष्टीतील माणसं पडद्यावर वेगळी आणि प्रत्यक्षात खूप वेगळीच असतात. अशोकला मी जेव्हा पहिल्यांदा जवळून पाहिलं तेव्हा तो पडद्यावरील अशोककुमारपेक्षा खूपच वेगळा वाटला. गावंढळ सावळा रंग, मोठे आणि खडबडीत हात, व्यायामामुळे मजबूत झालेलं शरीर, गावंढळपणाची झाक असलेली भाषा आणि खोटी सभ्यता. आमची ओळख करून दिल्यावर मी म्हणालो - 'तुम्हाला भेटून खूप आनंद झाला.'

अशोकने यावर जे काही म्हटलं ते खूप अवघड शब्दात होतं. आणि ते शब्द त्याने पाठ केल्याचं जाणवत होतं.

एकदा फिल्मिस्तानमध्ये एक सज्जन गृहस्थ स्टुडिओ बघण्यासाठी आले होते. ते प्रेमाने अशोकला म्हणाले - 'मला वाटतंय की, यापूर्वी आपण भेटलेलो आहोत.'


अशोकने काहीतरी निरर्थक उत्तर दिलं. नंतर त्याला त्याची जाणीवही झाली.

अशोकला उर्दू भाषा आवडते. सुरुवातीला त्याने उर्दूमध्ये लिहिण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्याची फारशी प्रगती झाली नाही. पण त्याला उर्दू भाषेची आवड आहे. एक-दोन ओळी तो उर्दूमध्ये लिहू शकतो. फाळणीनंतर मी त्याला सोडून पुन्हा बॉम्बे टॉकीजमध्ये आलो तेव्हा त्याने 'मी परत यावं' अशा अर्थाचं एक पत्र मला उर्दूमधून लिहिलं होतं. पण काही कारणांमुळे मी त्या पत्राचं उत्तर देऊ शकलो नाही याचं मला दुःख वाटतंय.

माझी बायकोही इतर स्त्रियांप्रमाणे अशोककुमारची 'फॅन' होती. ती त्याच्या प्रशंसकापैकी एक होती.

एके दिवशी मी अशोकला माझ्या घरी घेऊन आलो. घरात प्रवेश करताच मी जोराने बायकोला हाक मारली -

'सोफिया! बघ अशोककुमार आलाय.'



सोफिया स्वयंपाकघरात चपात्या करत होती. मी पुन्हा आवाज दिल्यावर ती बाहेर आली. मी तिची अशोककुमारशी ओळख करून दिली. 'ही माझी बायको दादामुनी... हात मिळव.'

अशोककुमार आणि सोफिया दोघेही संकोचले. पण मी अशोकचा हात पकडला - 'हात मिळव.. त्यात लाजायचं काय कारण आहे?'

नाईलाजाने त्याने सोफियाचा हात हातात घेतला. त्या दिवशी सोफियाने खिम्याची रोटी केलेली होती. अशोक जेवून आलेला होता. पण खायला बसल्यावर त्याने तीन रोट्या हडप केल्या.

विचित्र योगायोगाची गोष्ट अशी की, मुंबईत ज्या ज्या वेळी आमच्याकडे खिम्याची रोटी होत असे त्या त्यावेळी अशोक आमच्याकडे येत असे. याचं स्पष्टीकरण मी किंवा अशोक दोघंही देऊ शकणार नाही. 'दाने दाने पर लिखा है खाने वाले का नाम' असं म्हणतात तेच खरं.

मी अलीकडे अशोकला 'दादामणी' म्हणू लागलो. बंगालमध्ये याचा अर्थ मोठा भाऊ. अशोकची आणि माझी मैत्री घट्ट झाली तेव्हा त्याने मी त्याला 'दादामणी' म्हणावं असा हट्ट धरला. 'तू माझ्यापेक्षा मोठा कुठे आहेस? .. मी वयाने तुझ्यापेक्षा मोठा आहे,' मी त्याला म्हटलं.

मग वयाचा हिशेब केला गेला. तेव्हा तो माझ्यापेक्षा दोन महिने आणि काही दिवसांनी मोठा निघाला. त्यामुळे मला अशोकला मिस्टर गांगुली म्हणण्याऐवजी 'दादामणी' म्हणणं भागच पडलं. ते नाव मला आवडतही होतं. कारण त्यात बंगाली मिठाईचा गोडवा होता. तो मला सुरुवातीला मिस्टर मंटो म्हणत असे. पण जेव्हा मी त्याला 'दादामणी' म्हणायचं ठरवलं त्यानंतर तो मला फक्त 'मंटो' म्हणून संबोधू लागला. खरं म्हणजे मला ते बिलकुल पसंत नव्हतं.


पडद्यावर तो मला चॉकलेट हिरो वाटत असे. पण प्रत्यक्षात मात्र तो व्यायाम करणारा असा माणूस होता. त्याने ठोसा मारला तर दरवाजाला तडा जात असे, इतकी त्याच्या ठोश्यामध्ये ताकद होती. तो घरी नेहमी बॉक्सिंगची प्रॅक्टिस करत असे. त्याला शिकारीचा नाद नव्हता. पण अवघड, कष्टाची कामं तो सहज करत असे. त्याला व्यवस्थितपणाची मात्र अजिबात आवड नव्हती याचं मला दुःख होत असे. त्याने ठरवलं असतं तर सुंदर सुंदर वस्तूंनी तो त्याचं घर सजवू शकला असता. पण त्या गोष्टीकडे त्याने कधी लक्षच दिलं नाही. जर त्याने लक्ष घातलं तर काहीतरी विचित्र गोष्टी तो करत असे. ब्रश घेऊन सगळ्या फर्निचरला गडद निळा रंग देणं किंवा सोफ्याची पाठ तोडून त्याचा दिवाण बनवणं अशा गोष्टी तो करत असे.

त्याचं घर समुद्रकिनारी आहे. समुद्राचं खारं पाणी बाहेरून खिडक्यांना भिजवत असतं. जागोजागी लोखंडावर गंज चढलेला आहे. त्याची उदास करणारी दुर्गंधी येत असते. पण अशोकला त्याचं काहीही वाटत नाही. रेफ्रिजरेटर कॅरिडॉरमध्ये पडला आहे. त्याला टेकून अल्सेशियन कुत्रा झोपलेला असतो. शेजारच्या खोलीत मुलं दंगा करताहेत आणि अशोक बाथरूममध्ये पाटावर बसून भिंतीवर रेसमध्ये कोणता घोडा जिंकेल याचा हिशेब करत किंवा संवादाचा कागद हातात घेऊन तो संवाद पाठ करत शांतपणे बसला आहे हे नेहमीचं चित्र आहे.

अशोकला ज्योतिषाचा नाद आहे. तो ही विद्या त्याच्या वडिलांकडून शिकला आहे. त्याने या विषयावरची काही पुस्तकंही वाचलेली आहेत. सुट्टीच्या दिवशी तो वेळ घालवण्यासाठी मित्रांच्या जन्मपत्रिका पाहत असतो. माझ्या ग्रहांचा अभ्यास करून एके दिवशी त्याने मला अचानक विचारलं-

'मंटो, तू विवाहित आहेस?'

अशोककुमार आणि देविकाराणी - हिट जोडी



मी त्याला म्हणालो - 'तुला माहिती नाही?'

तो काही वेळ गप्प राहिला. मग म्हणाला - 'मला माहितीय. पण मंटो हे बघ, मला एक सांग... तुला मुलबाळ झालेलं नाही?'

मी विचारलं - 'का? ...तू हे का विचारतोयस ते तरी सांग.'

त्याने चाचरत म्हटलं - 'ज्या लोकांच्या पत्रिकेत ग्रहांची रचना अशी असते त्यांना पहिला मुलगाच होतो. पण तो जगत नाही.'

माझा मुलगा एक वर्षांचा होऊन वारला हे अशोकला माहिती नव्हतं.

त्याचा पहिला मुलगा जन्मताच मेलेल्या अवस्थेत होता. हे त्याने मला नंतर सांगितलं. तो म्हणाला की, 'तुझ्या आणि माझ्या ग्रहांची पोझिशन जवळजवळ सारखीच आहे. अशा व्यक्तींना पहिला मुलगाच होतो आणि तो जगत नाही.'

अशोकचा ज्योतिषावर विश्वास आहे. तो नेहमी म्हणतो की, 'ज्याप्रमाणे एका पैची कमी हिशेबात गडबड करते. त्याप्रमाणेच ग्रहांच्या हिशेबातही छोटीशी चूक झाली तर ती तुम्हाला कुठल्या कुठे घेऊन जाते. त्यामुळेच कोणतंही फळ घोषित करू नये. कदाचित आमच्याकडून चूकदेखील होऊ शकते.'

रेसच्या घोड्यांची टीप मिळवण्यासाठीही अशोक या ज्ञानाचा आधार घेतो. तासन्तास बाथरूममध्ये बसून हिशेब करत राहतो. पण रेसमध्ये १०० रुपयांपेक्षा जास्त पैसे त्याने कधी लावले नाहीत. आणि विचित्र योगायोगाची गोष्ट अशी की तो नेहमी जिंकतोच. कधी शंभराचे एकशेदहा होतात तर कधी शंभराचे शंभरच राहतात. पण शंभरातून एखादा पैसाही कमी झालाय असं कधीही होत नाही. तो रेस जिंकण्यासाठी खेळत नाही तर आनंद मिळवण्यासाठी खेळतो. त्याची रूपवान बायको नेहमी त्याच्याबरोबर असते. मेंबर्स एनक्लेजरमध्ये प्रवेश करताच तो एका बाजूला जाऊन बसतो. रेस सुरू होण्यापूर्वी आपल्या बायकोला पैसे देतो आणि अमुकतमुक नंबरची तिकिटं घेऊन ये म्हणून सांगतो. रेस संपल्यावर त्याची पत्नीच खिडकीवर जाऊन जिंकलेल्या तिकिटांचे पैसे घेऊन येते.

शोभा घरगुती स्त्री आहे. तिचं फारसं शिक्षण झालेलं नाही. अशोक गमती गंमतीमध्ये तिला अडाणी म्हणून चिडवतो. त्याचं वैवाहिक जीवन सफल आहे. शोभा इतकी श्रीमंती असूनही नेहमी कामात व्यस्त असते. अगदी बंगाली स्त्रियांप्रमाणे ती पांढरी साडी नेसून पदराला किल्ल्यांचा जुडगा लावून ती नेहमी घरातील कामात व्यग्र असते. संध्याकाळी कधी व्हिस्कीची मैफल जमलीच तर गजकचे पदार्थ शोभा आपल्या हाताने तयार करून देते. तर कधी तिखट शेव, भाजलेली डाळ वर कधी बटाट्याच्या चकत्या ती करून देते.

मी जरा जास्त पीत असे. त्यामुळे शोभा अशोकला म्हणत असे - 'हे बघा, मिस्टर मंटोंना जास्त देऊ नका. मिसेस मंटो आपल्याला बोलतील.'

श्रीमती मंटो आणि श्रीमती गांगुली दोघी मैत्रिणी होत्या. त्यामुळे आम्ही दोघं खूप कामं एकत्र करत असू. महायुद्धामुळे चांगल्या प्रतीच्या सिगरेट्स बाजारात उपलब्ध नव्हत्या. जेवढ्या सिगरेट्स बाहेरून येत तेवढ्या सगळ्या काळ्या बाजारात जात. आम्ही काळ्या बाजारातूनच त्या मिळवत असू. पण कुणाच्या मध्यस्थीने एखाद्या वेळी योग्य भावात ती वस्तू मिळाली तर आम्हाला खूपच आनंद होत असे.

मिसेस गांगुली शॉपिंगला निघत तेव्हा कधी कधी माझ्या बायकोलाही बरोबर घेऊन जात. जवळजवळ प्रत्येक दुकानदाराला मिसेस गांगुली, अशोककुमारची बायको आहे हे माहिती होतं. त्यामुळे तिने मागितल्यावर काळ्या मार्केटमधील अनेक वस्तू सहज प्राप्त होत असत.

अशोकने आपल्या लोकप्रियतेचा क्वचितच फायदा घेतला असेल. पण दुसरी माणसं मात्र त्याच्या लोकप्रियतेचा कळत-नकळत फायदा घेत असत. राजा मेहदी अली खाँ यांनी एकदा असा फायदा घेतला होता.

राजा मेहदी अली खाँ फिल्मिस्तानमध्ये नोकरीला होते. मी फिल्मिस्तान सोडून वलीसाहेबांसाठी एक कथा लिहीत होतो. एके दिवशी अशोकच्या सेक्रेटरीने मला फोन करून राजासाहेब आजारी असल्याचं सांगितलं. मी तिथे पोहोचलो तेव्हा त्यांची तब्येत खूपच खराब झाली होती. घसा बसला होता. त्यामुळे त्यांना बोलताच येत नव्हतं. अशक्तपणा इतका होता की, आधार देऊनही त्यांना उठता येत नव्हतं आणि ते मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करत होते आणि ओरिएंटल बाम लावून आपला इलाज करत होते. डिफ्थीरिया तर नसेल अशी मला शंका आली. मी तात्काळ त्यांना उचललं आणि अशोकला टेलिफोन केला. त्याने मला त्याच्या एका ओळखीच्या डॉक्टरकडे त्याला घेऊन जायला सांगितलं. मी राजासाहेबांना त्या डॉक्टरकडे घेऊन गेलो. तपासण्या केल्यावर कळलं की तो त्रासदायक आजार आहे. डॉक्टरसाहेबांच्या आदेशानुसार मी त्यांना हॉस्पिटलमध्ये भरती केलं. इंजेक्शन्स वगैरे दिली गेली. दुसऱ्या दिवशी मी अशोकला राजाच्या आजारासंबंधी सूचना दिली. त्याला काळजी वाटतेय असं काही त्याच्या बोलण्यावरून वाटलं नाही. मला त्याचा खूप राग आला. 'तू माणूस आहेस की कोण आहे? एक माणूस संसर्गजन्य रोगाच्या विळख्यात सापडलाय. त्याचं इथे बघणारं कुणी नाही आणि तू त्यात लक्ष घालायला तयार नाहीस म्हणजे काय?'

अशोक उत्तरादाखल इतकंच म्हणाला - ''आज संध्याकाळी त्याला भेटायला जाऊ.''

टेलिफोन ठेवून मी हॉस्पिटलमध्ये गेलो. राजाची हालत कालच्यापेक्षा पुष्कळ बरी होती. डॉक्टरांनी जी इंजेक्शन्स लिहून दिली होती ती मी घेऊन आलो होतो. ती त्याच्याजवळ देऊन आणि त्याला धीर देऊन मी माझ्या कामावर निघून गेलो.

संध्याकाळी अशोकने मला वलीसाहेबांच्या ऑफिसमध्ये पकडलं. मी नाराज होतो. पण त्याने मला राजी केलं. आम्ही त्याच्या गाडीने हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. आपण दुसऱ्या कामात अडकलो होतो म्हणून अशोकने राजाजवळ खेद प्रकट केला. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या आणि अशोक मला घरी सोडून आपल्या घरी गेला.

दुसऱ्या दिवशी मी हॉस्पिटलमध्ये गेलो तर राजा एखाद्या राजासारखाच बसला होता. कॉटवरची चादर बदललेली होती. उशीची खोळही शुभ्र होती. सिगरेटचा डबा उशाशी ठेवला होता. डोक्याजवळच्या खिडकीमध्ये फुलदाणीत फुलं ठेवलेली होती. हॉस्पिटलच्या स्वच्छ कपड्यात पायावर पाय टाकून तो वर्तमानपत्र वाचत बसला होता. मी आश्चर्याने विचारलं - ''राजा हे सगळं काय आहे?''

राजा हसला. त्याच्या मोठ्या मिशा थरथरल्या - ''हे तर काहीच नाही.... अजून तू पाहशील?''

''काय?'' मी विचारलं.

''सगळ्या सुखसुविधा मिळतील. मी अजून काही दिवस इथे राहिलो तर माझा जनानखाना शेजारच्या खोलीत असेल. खुदा अशोककुमारला भरपूर आयुष्य देवो. तो का नाही आला?''

थोड्या वेळाने ही सगळी अशोककुमारची कृपा असल्याचं राजाने मला सांगितलं. अशोककुमार त्याला भेटायला हॉस्पिटलमध्ये आला असल्याचं सगळ्यांना समजलं. त्यामुळे प्रत्येकाने येऊन विचारपूस केली. प्रत्येकाने त्याला विविध प्रश्न विचारले.

- अशोककुमार त्याच्या तब्येतीची चौकशी करायला खरंच आला होता?
- अशोककुमारचा आणि त्याचा संबंध काय?
- तो पुन्हा येणार आहे?
- कधी आणि कोणत्या वेळी येणार आहे?

राजाने त्यांना अशोककुमार त्याचा जवळचा मित्र असल्याचं सांगितलं, असंही सांगितलं की, त्याच्यासाठी आपले प्राणदेखील द्यायला तो तयार आहे. तो हॉस्पिटलमध्ये त्याच्याबरोबर राहणार होता. पण डॉक्टरने परवानगी दिली नाही. तो सकाळ-संध्याकाळ आला असता, पण सिनेमाचे करार असे आहेत की त्यामुळे तो येऊ शकत नाही. पण आज संध्याकाळी तो येणार आहे.

याचा परिणाम असा झाला की, सार्वजनिक हॉस्पिटलमध्येही त्याला सर्व सेवासुविधा मिळाल्या.

भेटीची वेळ संपली म्हणून मी जायला निघालो. इतक्यात मेडिकल कॉलेजच्या मुलींचा घोळका तिथे आला. राजा त्यांच्याकडे बघून हसला.

''मित्रा, जनानखान्यासाठी शेजारची खोली छोटी पडेल असं वाटतंय.''

अशोक खूप चांगला अभिनेता आहे. पण तो आपल्या ओळखीच्या लोकांबरोबर मनापासून काम करू शकतो. त्यामुळेच त्याच्या मित्रमंडळींनी न बनवलेल्या चित्रपटात त्याचं काम फारसं चांगलं झालेलं नाही. आपल्या लोकांमध्ये तो खुलून काम करतो. टेक्निशियन लोकांना सल्ले देतो, त्यांच्या सूचनांचा विचार करतो, आपल्या अभिनयाबाबत इतरांना मत विचारतो, एक दृश्य विविध प्रकारे करून पाहतो आणि त्याबद्दलची दुसऱ्यांची मतंही जाणून घेतो. अशा वातावरणातून त्याला कुणी दुसऱ्या ठिकाणी घेऊन गेलं तर त्याला खूप त्रास होतो.

अशोक उच्चशिक्षित होता. त्याने बॉम्बे टॉकीजसारख्या उत्तम दर्जा असलेल्या चित्रपटनिर्मिती करणाऱ्या संस्थेत खूप वर्ष काम केलं होतं. त्यामुळे अशोकला चित्रपट उद्योगातील प्रत्येक विभागाची चांगली माहिती होती. तो कॅमेऱ्याचे बारकावे जाणून होता. लॅबमधल्या समस्या त्याला समजत असत. एडिटिंगचा त्याला अनुभव होता आणि दिग्दर्शनाचाही त्याने बारकाईने अभ्यास केला होता. त्यामुळेच फिल्मिस्तानमध्ये त्याला रायबहाद्दूर चुन्नीलाल यांनी एक फिल्म प्रोड्यूस करायला सांगितली. तेव्हा तो लगेच तयार झाला.

त्या काळी फिल्मिस्तानच्या 'शिकारी' या चित्रपटाची खूप जाहिरात झालेली होती आणि तो पूर्णही झालेला होता. म्हणून मी गेले काही महिने मेहनत केल्यानंतर घरी सुट्टीचा आनंद घेत होतो. एके दिवशी सावक वाचा माझ्याकडे आले. इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्यानंतर मला म्हणाले - ''आदत, गांगुलीसाठी एक कथा लिहून दे.'' सावकला काय म्हणायचं ते माझ्या लक्षात आलं नाही. मी फिल्मिस्तानमध्ये नोकरीला होतो आणि कथा लिहिणं हेच माझं काम होतं. गांगुलीसाठी कथा लिहायची असेल तर सावकच्या शिफारशीची काय गरज होती? मला फिल्मिस्तानच्या एखाद्या जबाबदार सदस्याने जरी सांगितलं असतं तरी मी कथा लिहायला घेतली असती. पण नंतर मला समजलं की अशोक स्वत: चित्रपट निर्माण करू इच्छित होता आणि आतापर्यंत कुणीही स्पर्श न केलेला एखादा विषय मी कथेसाठी निवडावा अशी त्याची इच्छा होती. त्याने अनेकांच्या कथा ऐकल्या होत्या आणि म्हणूनच तो माझ्याकडे आला नव्हता. शेवटी सावकच्या बरोबर वेळ ठरवून आम्ही त्याच्याच फ्लॅटमध्ये जमलो. अशोकला माहिती नसलेली कथा हवी होती. त्यामुळे तो म्हणाला - ''मंटो अशी कथा ऐकव की मजा आली पाहिजे. हा माझा पहिला चित्रपट आहे हेही लक्षात ठेव.''

आम्ही सगळ्यांनी अनेक तास एकमेकांचं डोकं खाल्लं. पण काहीही सूचेना.

दिवसभरचा थकवा आणि उदासी घालवण्यासाठी संध्याकाळी टेरेसवर ब्रॅण्डीची तयारी केली गेली. दारूची निवड करण्यात सावक वाचा तरबेज आहे. त्याने आणलेली ब्रॅण्डी खूपच चांगली होती. ती गळ्याखाली उतरताच आनंद वाटला. समोरच चर्चगेटचं स्टेशन होतं. खाली बाजारात गडबड गोंधळ चालू होता. बाजाराच्या एका टोकाला समुद्र शांत पहुडला होता. चमचमणाऱ्या किमती कार्स रस्त्यावरून फिरत होत्या.... थोड्या वेळाने एक बुलडोझर धापा टाकत आला. मी असा विचार केला की, ... जर या टेरेसवरून एखाद्या मुलीने एक लिहिलेला कागद खाली सोडला आणि तो ज्याच्या हातात सापडेल त्याच्याशी तिने लग्न करायचं असं ठरवलं तर... तर काय होईल?... कदाचित तो कागद एखाद्या पेकॉर्ड मोटारीच्या मालकाला मिळेल किंवा इंजिन ड्रायव्हरला सापडेल... काहीही घडू शकतं.

मी ही कल्पना अशोकला सांगितली. सावकलाही सांगितली. त्यांना मजा वाटू लागली. मग आम्ही त्या आनंदात ब्रँडीचा अजून एक एक पेग घेतला. त्यामुळे कल्पनेच्या भराऱ्या मारायला सुरुवात झाली. जेव्हा आमची मैफील संपली तेव्हा कथा या मध्यवर्ती कल्पनेवर बेतायची असं ठरलं.

कथा तयार झाली. पण तिचं रूप काही वेगळंच झालं होतं. सुंदर मुलीने लिहिलेला एक कागदही राहिला नाही आणि तो बुलडोझरही राहिला नाही. पहिला विचार ट्रॅजेडी करण्याचा होता. पण अशोकच्या म्हणण्यानुसार कॉमेडीसाठी कथा तयार केली गेली. बुद्धीची सारी ताकद कॉमेडीसाठी खर्च झाली. कथा पूर्ण झाल्यावर ती अशोकला वाचून दाखवली. त्याला ती खूपच आवडली. शूटिंग सुरू झालं. या चित्रपटाची एक-एक फ्रेम अशोकुमारच्या दिग्दर्शनाखाली चित्रित केली जाऊ लागली. 'आठ दिन' हा चित्रपट अशोककुमारच्या दिग्दर्शनाखाली तयार करण्यात आला हे खूप कमी लोकांना माहीत आहे.

अशोक जितका चांगला अभिनेता आहे तितकाच चांगला दिग्दर्शकही आहे ही गोष्ट 'आठ दिन'च्या शूटिंगच्या वेळी माझ्या लक्षात आली. तो साध्या साध्या दृश्यांवरही खूप मेहनत करत होता. शूटिंगच्या आदल्या दिवशी तो माझ्याकडून पुनर्लिखित सीन घेत असे आणि बाथरूममध्ये तासन्‌तास बसून त्यावर विचार करत असे. तो बाथरूमशिवाय इतर

कोणत्याही ठिकाणी शांतपणे विचार करू शकत नाही ही एक विचित्र गोष्ट आहे.

या चित्रपटात चार नवे लोक ॲक्टर म्हणून पडद्यावर आले. राजा मेहंदी अली खाँ, उपेंद्रनाथ अश्क, महरून अब्दुल्ला आणि स्वत: मी. खरं म्हणजे एस. मुखर्जी यांना एक भूमिका देण्याचं निश्चित झालं होतं. पण वेळेवर त्यांना नाही म्हटलं. मी त्यांच्या 'चल चल रे नौजवान'मध्ये कॅमेऱ्याच्या भीतीने काम करायचं नाकारलं होतं. म्हणून ते नाही म्हणताहेत असं त्यांनी सांगितलं. खरं म्हणजे त्यांनाही कॅमेऱ्याची खूप भीती वाटत होती.

त्यांना एका फौजीची भूमिका करायची होती. त्याची ड्रेपरी तयार करून घेण्यात आली होती. एस. मुखर्जी नाही म्हटल्यावर अशोक सरपटला. त्याच्या जागी कुणाला घ्यावा असा प्रश्न त्याच्यासमोर उभा राहिला. शूटिंग कितीतरी दिवस बंदच होतं. रायबहाद्दूर चुन्नीलाल संतापले. मग अशोक माझ्याकडे आला. मी काही दृश्यं दुसऱ्यांदा लिहून काढत होतो. त्याने टेबलावरचा कागद उचलून एका बाजूला ठेवला आणि म्हणाला – ''मंटो चल!''

मी त्याच्याबरोबर चालू लागलो. तो मला नवी गाणी ऐकवण्यासाठी घेऊन चाललाय असा माझा समज होता. पण तो मला सेटवर घेऊन गेला आणि म्हणाला – ''वेड्याची भूमिका तुला करायची आहे.''

मुखर्जी नाही म्हणाला हे मला माहीत होतं आणि अशोकला या भूमिकेसाठी माणूस मिळत नव्हता. पण तो मलाच हा रोल करायला सांगेल याची मात्र कल्पना नव्हती. म्हणून मी त्याला म्हणालो – ''वेडा झालायस का?''

अशोक गंभीर झाला आणि मला म्हणाला – ''मंटो तुला ही भूमिका करावीच लागेल.''

राजा मेहंदी अली खाँ आणि उपेंद्रनाथ अश्क यांनीही आग्रह केला. राजा म्हणाला – ''तू मला अशोकचा मेव्हणा बनवलंस. खरं म्हणजे अशोकबद्दल माझ्या मनात खूप आदर आहे. त्यामुळे मी तयार नव्हतो. मग तू वेडा झालास तर आभाळ कोसळणार आहे का?''

यावर चेष्टामस्करी सुरू झाली आणि या गंमती गंमतीतच सआदत हसन मंटो वेड्या फ्लाइट लेफ्टनंटची भूमिका करायला तयार झाला. कॅमेऱ्यासमोर माझे जे हाल झाले ते फक्त मीच जाणू शकतो.

चित्रपट पूर्ण होऊन प्रदर्शित झाला आणि यशस्वीदेखील झाला. समीक्षकांनी याला सर्वोत्कृष्ट कॉमेडी म्हणून घोषित केलं. मी आणि अशोक खूप खूश होतो. यानंतर नवीन प्रकारचा चित्रपट बनवण्याचं आम्ही ठरवलं. पण परमेश्वराला ते मंजूर नसावं.


अशोक जितका चांगला अभिनेता आहे तितकाच चांगला दिग्दर्शकही आहे ही गोष्ट 'आठ दिन'च्या शूटिंगच्या वेळी माझ्या लक्षात आली. तो साध्या साध्या दृश्यांवरही खूप मेहनत करत होता. शूटिंगच्या आदल्या दिवशी तो माझ्याकडून पुनर्लिखित सीन घेत असे आणि बाथरूममध्ये तासन्तास बसून त्यावर विचार करत असे. तो बाथरूमशिवाय इतर कोणत्याही ठिकाणी शांतपणे विचार करू शकत नाही ही एक विचित्र गोष्ट आहे.

सावक वाचा 'आठ दिन' या चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात झाल्याबरोबर आईच्या आजारपणासाठी इंग्लंडला गेला होता. तो जेव्हा परत आला तेव्हा चित्रपटक्षेत्रात बरीच उलथापालथ झालेली होती. कित्येक कंपन्यांचं दिवाळं निघालं होतं. बॉम्बे टॉकीजची अवस्थाही चिंताजनक होती. स्वर्गीय हिमांशु राय यांच्यानंतर देविकाराणीने काही वर्षं वैधव्यात काढली. पण नंतर ती एका रशियन माणसाबरोबर लग्न करून चित्रपटसृष्टीला रामराम ठोकून निघून गेली होती. देविकाराणीनंतर बॉम्बे टॉकीजवर बाहेरच्या कित्येक लोकांनी कब्जा करायचा प्रयत्न केला. पण बॉम्बे टॉकीजची स्थिती काही सुधारली नाही. शेवटी सावक वाचा लंडनहून परत आले आणि त्यांनी साहस दाखवून, अशोकच्या सहकार्याने बॉम्बे टॉकीजचा कारभार आपल्या हातात घेतला.

अशोकला फिल्मिस्तान सोडावी लागली. या दरम्यानच लाहोरच्या मोती बी. गिडवानी यांनी मला टेलिग्राम पाठवून एक हजार रुपये महिना पगार देण्याची तयारी दर्शवली. मी गेलो असतो. पण मी सावकची वाट पाहत होतो. अशोक आणि सावक या दोघांनी बॉम्बे टॉकीजचा कारभार हातात घेतला तेव्हा मी त्यांच्याबरोबर होतो. याच काळात इंग्रज हिंदुस्थानची फाळणी करण्याच्या विचारात होते आणि कच्चे नकाशे तयार करायला सुरुवात झाली होती. वाळलेल्या गवतात ठिणगी टाकून इंग्रज बाजूला उभे राहून तमाशा बघण्यासाठी जागा शोधत होते.

मी बॉम्बे टॉकीजमध्ये पाऊल ठेवलं त्या वेळी हिंदू-मुसलमानांमध्ये दंगे सुरू झालेले होते. क्रिकेट मॅचमध्ये विकेट उडते त्याप्रमाणे निरपराध माणसांची डोकी उडवली जात होती आणि मोठमोठ्या आगी लावल्या जात होत्या. सावक वाचाने बॉम्बे टॉकीजचा कारभार हातात घेतला. तेव्हा अनेक समस्या त्यांच्यासमोर उभ्या होत्या. अनावश्यक तत्त्व बाहेर काढायची म्हणून काही हिंदूंना बाहेर काढलं गेलं. त्यामुळे गोंधळ सुरू झाला. मुख्य पदांवर मुसलमान ठेवले गेले. मी, शाहिद लतीफ, इस्मत चुगताई, कमाल अमरोही, हसरत लखनवी, नजीर अजमेरी, नाजिम पानीपती आणि संगीत दिग्दर्शक गुलाम हैदर ही सगळी मुस्लिम मंडळी तिथेच राहिली. त्यामुळे इतर हिंदू कर्मचाऱ्यांच्या मनात सावक वाचा आणि अशोककुमार यांच्याबद्दल घृणा उत्पन्न झाली. मी अशोकला हे सांगितलं तर तो हसू लागला – ''मी वाचाला सांगून त्या लोकांना फटकारीन.''

लोकांना फटकारलं गेलं तर त्याचा परिणाम उलटाच झाला. जर मुसलमानांना स्टुडिओतून बाहेर काढलं नाही तर स्टुडिओ जाळून टाकू अशा धमक्यांची निनावी पत्रं सावक वाचाला येऊ लागली. ही पत्रं वाचून



त्याचा संताप झाला. ''मला अक्कल शिकवतायत... मी चूक केली तर यांच्या बापाचं काय जातंय?... आग लावतायत साले... त्यांनी स्टुडिओला आग लावली तर मी त्यांना त्या आगीत फेकून देईन.''

अशोकच्या मनात जातीधर्माबद्दल वेडेवाकडे विचार कधीच येत नाहीत. आग लावण्याची धमकी देणारे ज्या पद्धतीने विचार करत होते तसा विचार तो करूच शकत नव्हता. तो मला नेहमी म्हणत असे - ''मंटो हा सगळा वेडेपणा आहे... हळूहळू हा वेडेपणा कमी होईल.''

पण वेडेपणा हळूहळू कमी होण्याऐवजी वाढतच चालला होता. आणि मी स्वत:लाच अपराधी समजत होतो. कारण अशोक आणि वाचा माझे मित्र होते. माझा सल्ला घेत होते. त्यांचा माझ्या प्रामाणिकपणावर विश्वास होता... पण जर बॉम्बे टॉकीजला काही झालं तर मी अशोकला आणि वाचाला तोंड कसं दाखवू शकेन? या विचाराने मी मात्र अर्धमेला झालो होतो.

अशोकच्या मनात जातीधर्माबद्दल वेडेवाकडे विचार कधीच येत नाहीत. आग लावण्याची धमकी देणारे ज्या पद्धतीने विचार करत होते तसा विचार तो करूच शकत नव्हता. तो मला नेहमी म्हणत असे - ''मंटो हा सगळा वेडेपणा आहे... हळूहळू हा वेडेपणा कमी होईल.''

जातीय दंगे जोरात सुरू होते. एके दिवशी मी आणि अशोक बॉम्बे टॉकीजमधून परत जात होतो. रस्त्यामध्ये त्याच्या घरी आम्ही उशिरापर्यंत बसलो. संध्याकाळी तो म्हणाला - ''चल मी तुला सोडतो.''

शॉर्टकट घेण्याच्या नादात त्याने गाडी मुस्लिम मोहल्ल्यात घातली... समोरून एक वरात येत होती. मी बँडचा आवाज ऐकला आणि माझे हातपायच गळाले. अशोकचा हात पकडून मी ओरडलो - ''दादामणी! इकडे कुठे गाडी घातलीत?''

अशोकला मी काय म्हणतो ते समजलं. तो हसून म्हणाला - ''काही चिंता करू नकोस.''

मी चिंता कशाला करू? गाडी अशा मुस्लिम मोहल्ल्यात होती की तिथून कुणाही हिंदूचं जाणं धोक्याचं होतं. अशोकला सगळे जण ओळखत होते. त्यामुळे त्याची हत्या महत्त्वपूर्ण ठरली असती. मला अरबी भाषेतील प्रार्थना येत नव्हती. कुराणातील महत्त्वाचा भागही पाठ नव्हता. मी स्वत:लाच शिव्या देत होतो आणि मनातल्या मनात खुदाची करुणा भाकत होतो.

''हे अल्ला, माझी इज्जत राख... एखाद्या मुसलमानाने अशोकची हत्या केली तर जन्मभर त्याच्या हत्येचं पाप माझ्या मानगुटीवर बसेल. ही काही धर्माची मानगुट नाही, माझी स्वत:ची आहे. पण अशा कारणासाठी मी दुसऱ्या जातीधर्माच्या लोकांसमोर ती झुकावी असं मला वाटत नाही.''

गाडी वरातीच्या जवळ पोहोचली तेव्हा लोक 'अशोककुमार! अशोककुमार! म्हणून ओरडू लागले. मी खूप नर्व्हस झालो. अशोक स्टेअरिंगवर हात ठेवून शांत बसला होता. मी बाहेर येऊन त्या लोकांना सांगणार होतो की, ''हे बघा. तुम्ही शुद्धीवर या. मी मुसलमान आहे. तो मला घरी सोडायला निघाला आहे...''

पण त्या गर्दीतून दोन तरुण पुढे आले आणि म्हणाले - ''अशोकभाई! पुढून रस्ता मिळणार नाही. तुम्ही या बाजूच्या गल्लीतून निघून जा.''

अशोकभाई! अशोक त्यांचा भाऊ झाला होता आणि मी कोण होतो? ... मी माझ्या कपड्यांकडे पाहिलं. ते खादीचे होते.... ते मला काय समजले माहिती नाही... कदाचित त्यांनी अशोककुमारमुळे माझ्याकडे पाहिलंही नसावं.

गाडी मुस्लिम मोहल्ल्यातून निघाली तेव्हा माझ्या जिवात जीव आला. मी अल्लाचे आभार मानले, तेव्हा अशोक हसू लागला - ''तू उगीचच घाबरलास... कलावंताला हे लोक काही करत नाहीत.''

काही दिवसांनंतर बॉम्बे टॉकीजमध्ये नजीर अजमेरीची कथा वाचली गेली. मी त्यावर टीकाटिप्पणी केली आणि त्यात काही बदल सुचवले. तर नजीर अजमेरी अशोकला आणि वाचाला म्हणाले - ''मंटोला अशा चर्चेच्या वेळी बोलावत जाऊ नका. तो स्वत: कथाकार असल्याने त्याच्या मनात ईर्षा असते.''

मी खूप विचार केला पण मला काहीच समजलं नाही. शेवटी मी स्वत:लाच म्हणालो - ''मंटोभाई! पुढे रस्ता नाहीये. गाडी थांबव आणि बाजूच्या गल्लीतून निघून जा.''

आणि मी चूपचाप बाजूच्या गल्लीतून पाकिस्तानला निघून आलो. तिथे माझ्या 'ठंडा गोस्त' वर खटला दाखल झाला होता.